# प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/ ७२१० /२०१८ पुणे शहर, दिनांक – १३.०८.२०१८

**विषय :- मद्य प्राशन करुन वाहन चालविण्या वाहनचालकांवर करण्यात आलेल्या कारवाई बाबत.**

--------oo--------

पुणे शहरातील अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता व वाहतूक सुरळीत व सुरक्षित चालणेकरीता वाहतूक शाखेकडून वारवांर वेगवेगळया कलमाखाली विशेष मोहिमांचे आयोजन केले जाते.

पुणे शहरात अपघात टाळणेसाठी व वाहतूकीस शिस्त लागणेसाठी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दिलेल्या सुचनांवरुन पुणे शहर वाहतूक शाखेतर्फे दिनांक ११/०८/२०१८ व १२/०८/२०१८ रोजी **ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह** संदर्भात विशेष मोहिम राबविण्यात आली, यामध्ये एकुण **४८८** वाहनचालकांवर मोटार वाहन कायदा कलम १८५ नुसार कारवाई करुन त्यांचे विरुध्द मा.मोटार वाहन कोर्ट,पुणे यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

याप्रमाणे **मद्यपान करून वाहन चालविणारे** वाहनचालकांविरुध्द विशेष मोहिम यापुढेही चालू राहणार आहे.

तरी नागरीकांना याद्वारे असे आवाहन करण्यात येते की, मद्यपान केल्याने अपघात होत असून मद्यपान करुन वाहन चालवू नये, वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करुन वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.